सह्याद्री सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित

नोंदणी क्रमांक-एन.बी.ओ.एम./सिडको/एच.एस.जी./(टी.सी.)/१८४१/जेटीआर/सन २०२३-२०२४

ई-१/६ ते ई-१/१०, भूखंड क्र. ०२, सेक्टर- १४, नवीन पनवेल (पुर्व), नवी मुंबई.

संदर्भ, 53/2026

दिनांक : 4/02/2026.

विशेष सर्वसाधारण सभा क्रमांक १५ चे इतिवृत्त

सह्याद्री सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित च्या सदनिका धारकांची विशेष सर्वसाधारण सभा क्रमांक १५ मंगळवार दिनांक २७ जानेवारी २०२६ रोजी सी.के.टी. विद्यालय नवीन पनवेल रूम नंबर ६५ मध्ये सायंकाळी ठीक ६:३० वाजता संपन्न झाली .

सभेला सुरुवात होण्यापूर्वी आपल्या प्रभाग क्रमांक 17 मधील सर्व सुविद्य नवनिर्वाचीत नगरसेवकांचे सर्वांनी टाळ्या वाजून अभिनंदन केले.

ठराव क्रमांक-१) संस्थेचे सहसचिव श्री हरिश्चंद्र ठाकूर यांनी आजच्या सभेचे अध्यक्ष स्थान विद्यमान अध्यक्ष श्री प्रदीप ठाकूर सर यांनी स्वीकारावे असे सूचीत केले.त्यावर संस्थेचे खजिनदार श्री विष्णू गवस यांनी अनुमोदन दिले. श्री प्रदीप ठाकूर सर यांनी सभेचे अध्यक्षस्थान स्वीकारत आहे असे जाहीर केले व उपस्थित सदनिका धारकांनी त्यांचे टाळ्या वाजवून स्वागत केले.

सूचक-: श्री हरिश्चंद्र ठाकूर

अनुमोदक-: श्री विष्णू गवस

सदर ठराव सर्वानुमते मंजूर

अध्यक्षांच्या परवानगीने सभेचे कामकाज सुरू करण्यात आले.

विषय क्रमांक -:१) मागील विशेष सर्वसाधारण सभा क्रमांक १४ च्या सभेचे इतिवृत्त वाचन करून मंजुरी घेणे.

संस्थेचे सचिव श्री प्रकाश बिनेदार साहेब यांनी विषयाची मांडणी केल्यानंतर असे सूचित केले की विशेष सर्वसाधारण सभा(क्रमांक १४)चे इतिवृत्त आपण आपल्या इमारतींच्या ग्रुप

वर व वेबसाईटवर टाकण्यात आलेले असल्यामुळे त्याचे वाचन करणे आवश्यक आहे का? त्यावर उपस्थितांनी असे संबोधित केले की इतिवृत्त इमारतीच्या ग्रुप वर वेबसाईट टाकल्यामुळे त्याचे वाचन करण्याची आवश्यकता नाही सदरचे इतिवृत्त मंजूर आहे. त्यामुळे उपस्थित सदनिका धारकांनी ईतीवृत्तास आपली मंजुरी दिली.

विषय क्रमांक :२) विकासक आणि पी.एम.सी .यांची ओळख करून देणे.

संस्थेचे सचिव श्री प्रकाश बिनेदार साहेब यांनी विषयाची मांडणी केल्यानंतर. विकासक (के.टी. होम्स) चे प्रतिनिधी हितेश वाधवानी यांनी आपल्या सर्व टीमचा परिचय करून देण्यात आला. तसेच पी .एम. सी. (एन्टीटी आर्किटेक्टस्) चे प्रतिनिधी सिद्धांत खाडे साहेब यांनी आपल्या उपस्थित टीमचा परिचय करून देण्यात आला.

विषय क्रमांक -:३) अतिरिक्त वाढीव क्षेत्र घेणारे सभासद यांच्या प्रश्नांचे व शंकांचे निरसन करणे व विकासक यांच्याशी चर्चा घडवून आणणे व निर्णय घेणे.

विषयाची मांडणी झाल्यानंतर श्री प्रकाश बिनेदार साहेब सभेत संबोधित करत असताना.व्ही.जे.टी.आय.(V.J.T.I.) मुंबई कडून स्ट्रक्चरल ऑडिट अहवाल संस्थेकडे पाठविला आहे.श्री जयधर पाटील यांनी असा प्रश्न उपस्थित केला की अतिरिक्त वाढीवक्षेत्राचा दर हा बिल्टअप एरियाप्रमाणे लावण्यात आलेला आहे तर तो आम्हाला रेरा कार्पेट प्रमाणे लावण्यात यावा त्याचा फायदा सदनिका धारकांना मिळावा. त्यावर विकासक हितेश वाधवाणी यांनी असे सांगितले की आपणास बिल्ट अप प्रमाणे व रेरा प्रमाणे दोन्ही प्रकारचे दर देण्यात येतील. तसेच श्री दिपक रोहेकर यांनी केलेल्या सूचनांचे वाचन करण्यात आले. त्याने असा प्रश्न उपस्थित केला की इमारतींची उंची वाढत असल्यामुळे एफ. एस .आय.(F. S.I.)चा फायदा सदनिकाधारकांना मिळावा त्यावर पी.एम सी .चे प्रतिनिधी सिद्धांत खाडे यांनी सांगितले की उंची वाढली तरी F. S .I.वाढत नाही. त्या संदर्भात माहिती मिळेल का त्यावर सिद्धांत खाडे यांनी सांगितले की आपल्याला माहिती देण्यात येईल. तसेच श्री रोहेकर यांनी असे सूचित केले की क्लब चार्जेस व डेव्हलपमेंट चार्जेस सुद्धा सदनिकाधारकांना लावू नये कारण आम्ही प्रत्येक

सदनिकेमध्ये सदस्य संख्या तेवढीच असणार आहे त्यामुळे क्लब चार्जेस व डेव्हलपमेंट चार्जेस रद्द करावे. त्यानंतर श्री जगदीश घरत साहेब यांनी पी.एम.सी .व विकासकांना असे सूचित केले की वाढीव क्षेत्राचा डेव्हलपमेंट चार्जेस व क्लब चार्जेस रद्द करण्याबाबत किंवा कमी करण्याच्या संदर्भात विचार करण्यात यावा.

इमारतीची वाढत असलेली उंची ,डेव्हलपमेंट चार्ज व क्लब चार्ज याच्यावर समाधानकारक उत्तर न मिळाल्यामुळे आपण या संदर्भात रविवार दिनांक ८ फेब्रुवारी २०२६ रोजी ठीक ११:०० वाजता काली माता मंदिर किंवा संत साईबाबा हॉल या ठिकाणी एकत्रीत बसून सभेचे आयोजन करण्यात यावे असे संस्थेचे सचिव श्री प्रकाश बिनेदार साहेब यांनी सुचित केले त्यावर श्री रत्नाकर पाटील यांनी त्यास अनुमोदन दिले.

सुचक -: श्री प्रकाश बिनेदार

अनुमोदक -: श्री रत्नाकर पाटील

सदरचा ठराव सर्वानुमते मंजूर.

श्री प्रकाश बिनेदार साहेब यांनी उपस्थित सदनिका धारकांचे आभार मानून अध्यक्षांच्या वतीने सभा संपन्न झाली असे जाहीर करण्यात आले.

सह्याद्री सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित

अध्यक्ष

सचिव

सह्याद्री सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित